# ज्योतिर्मय

साहित्याचे विद्यापीठ

Online Journal of Literature....

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २० वा ❑ मंगळवार दि.१८ फेब्रुवारी २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

# लग्नात सिबिल स्कोअर ठरतोय खलनायक!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

यवतमाळ जिल्ह्यातील ढाणकी परिसरात गुप्त धन शोधणारी टोळी सक्रिय असल्याची चर्चा होती. त्या अनुषंगाने बिटरगाव पोलीस त्या गुप्तधन शोधणाऱ्या टोळीच्या शोधात होते. दरम्यान, काही संशयित व्यक्ती गुप्तधन शोधत असल्याची गोपनीय माहिती बिटरगाव पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे गणेश मामीलवाड यांचे शेतात धाड टाकून त्यात पाच संशयितांना अटक करण्यात आली. अशा बातम्या आपण अनेकदा वाचत असतो. कुठेतरी उत्खनन करताना एखाद्याच्या जमिनीत खजिना गाडलेला आढळला, किंवा कुठेतरी शेत नांगरणाऱ्या शेतकऱ्याला त्याच्या शेतात गाडलेला खजिना सापडला. आता अशा परिस्थितीत प्रश्न असा उद्भवतो की जर एखाद्या व्यक्तीला त्याच्या जमिनीत गाडलेला खजिना सापडला तर त्यावर त्याचा अधिकार असेल की सरकारचा ?

जेव्हा तुम्हाला खजिना सापडतो तेव्हा तुम्ही काय करावे?खजिना सापडल्यावर काय करावे हे कायद्याने सांगितले आहे. जर कोणाला जमिनीखाली गाडलेला खजिना आढळला तर त्याने प्रथम जवळच्या पोलिस ठाण्याला त्याची माहिती द्यावी. जर त्या व्यक्तीने पोलिस आणि प्रशासनाला याची माहिती दिली नाही तर भविष्यात तो अनेक प्रकारच्या कायदेशीर अडचणीत सापडू शकतो.

माहिती दिल्यानंतर, प्रशासन खजिना आपल्या ताब्यात घेते आणि नंतर त्याचा सविस्तर अहवाल तयार करून सरकारला पाठवते. या प्रक्रियेनंतर खजिना सुरक्षितपणे तिजोरीत जमा केला जातो. यानंतर सरकार तिजोरीतून पैसे कुठे जायचे हे ठरवते. खरं तर, बऱ्याचदा असे खजिना अशा संस्थांना पाठवले जातात जे या बाबींमध्ये संशोधन करतात. भारतात अशीच एक संस्था म्हणजे भारतीय पुरातत्व सर्वेक्षण.१९६० पासून, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण विभागाला भूमिगत उत्खनन करण्याचे पूर्ण अधिकार आहेत. पुरातत्वीय महत्त्वाच्या वस्तू आणि भूगर्भातील इतर गोष्टी उत्खनन करण्याचे अधिकार त्यांनाच होते. १९७१ मध्ये जमिनीत सापडलेल्या खजिन्याबाबत कायदा करण्यात आला. त्याला डाफिना कायदा असे नाव देण्यात आले.

**जमीन मालकाला काय मिळते?**

अशा प्रकरणांमध्ये डॅफिना कायद्यांतर्गत कारवाई केली जाते आणि डॅफिना कायद्यात स्पष्टपणे लिहिले आहे की जर एखाद्याला जमिनीखालून पैसे किंवा खजिना सापडला तर त्यावर सरकारचा अधिकार आहे. तथापि, जर जमिनीच्या मालकाला वाटत असेल की जमिनीतील संपत्ती त्याची आहे आणि ती त्याच्या कुटुंबाची आहे, तर तो त्यासाठी न्यायालयात जाऊ शकतो. बऱ्याच वेळा जेव्हा जमिनीचा मालक प्रशासनाला खजिन्याबद्दल योग्य माहिती देतो आणि सर्वकाही खरे सांगतो, तेव्हा सरकार आनंदाने खजिन्याच्या एकूण किमतीच्या १० ते २० टक्के रक्कम जमिनीच्या मालकाला बक्षीस म्हणून देते. तथापि, सरकारने हे द्यावे की नाही हे निश्चित नाही. हे करणे किंवा न करणे हे पूर्णपणे सरकारच्या इच्छेवर अवलंबून आहे.

दफन कायद्यानुसार, जमिनीखाली सापडलेला कोणताही पैसा किंवा मालमत्ता सरकारची असते. जमिनीखाली खोदकाम करणे बेकायदेशीर आहे. भारतीय पुरातत्व विभागाला भूगर्भात उत्खनन करण्याचा अधिकार आहे. जर एखाद्याच्या जमिनीवर गाडलेला खजिना सापडला तर त्याची माहिती स्थानिक प्रशासनाला द्यावी लागते. सरकार शोधणाऱ्याला काही बक्षीस देऊ शकते. राज्याच्या किंवा देशाच्या हद्दीत सापडणाऱ्या कोणत्याही पैशावर, सोने, कोळसा, पेट्रोलियम इत्यादींवर सरकारचा अधिकार आहे.

# मराठी साहित्य संमेलन या मातीशी, संस्कृतीशी जुळलेले

## मराठवाड्याला दिशा देण्याचे काम मराठवाडा साहित्य संमेलन सातत्याने करतेय समारोपप्रसंगी विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांचे गौरवोद्गार

**ज्योतिर्मय साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** आज राज्यात जातीची आणि मातीची खदखद आहे. असे विदारक चित्र असतानाही राज्यातील तरुण कवी, लेखक नव्या दिशेने लिहीत आहेत. मराठी साहित्य संमेलन या मातीशी, संस्कृतीशी जुळलेले आहे. ही संस्कृती आणि माती मजबूत करण्याचे काम, मराठवाड्याला दिशा देण्याचे काम मराठवाडा साहित्य संमेलन सातत्याने करत आलेले असल्याचे गौरवोद्गार विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी काढले.



बजाज नगरातील विजय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित दगडोजीराव देशमुख महाविद्यालयाच्या रौप्य महोत्सवानिमित्त आयोजित ४४व्या मराठवाडा साहित्य संमेलनाचा समारोप रविवार १६ रोजी थाटात करण्यात आला. यावेळी समारोप कार्यक्रमाला विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, संमेलन स्वागतध्यक्ष विजय कुमार राऊत, प्रा. हजारे, मनीष जैस्वाल, मसापचे डॉ. दादा गोरे, गणेश मोहिते, स सो खंडाळकर आदी मान्यवरांची विशेष उपस्थिती होती. समारोपदिनी मुलाखत, विशेष संवाद, परिसंवाद आदी साहित्यप्रकारांसह बाल साहित्यिकांचा बालकुमार मेळावा आदी कार्यक्रम सादर झाले. समाज साहित्य चित्रपट व मालिका यावर विशेष परिसंवादात अभिनेत्री चिन्मयी सुमित, गीतांजली कुलकर्णी, गणेश चंदनशिवे आणि सूत्रधार प्रेषित रुद्रवार यांनी सहभाग घेतला. तर शाहू पाटोळे यांची मुलाखत झाली. यावेळी साहित्य रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी आ. दानवे बोलत होते.

आ. दानवे पुढे म्हणाले, नुकतेच नरेंद्र चपळगावकर आणि प्रा. रा. रं. बोराडे सारखे दिग्गज महान साहित्यिकांचे निधन झाले. राज्यातील ही महान हस्ती आपल्यातुन निघून गेली. अशा महान राज्यात संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत तुकाराम, संत एकनाथ यांचे विचार प्रत्येकाला कायम प्रेरित करत राहतील अशी आशा करायला हरकत नाही. त्यांचे विचार आपल्या मराठवाड्याच्या विकासाच्या दृष्टीने कशाप्रकारे कशा पद्धतीने पुढे जाता येईल यासाठी असे संमेलने सातत्याने होत राहिले पाहिजे.

खऱ्या अर्थाने साहित्य हे समाजाचा आरसा असतो. समाजाच्या व्यथा मांडतात. शेतकऱ्याच्या, कष्टकऱ्यांच्या, माताभगिनींच्या व्यथा साहित्य मांडत असतो, आणि या साहित्य संमेलनात या सर्वांच्या व्यथा मांडल्या गेल्या असल्याचे दिसून येते. शेतमालाचा भाव, कर्ज, महिलांवरील अत्याचार, स्थानिक विकासाचे प्रश्न या सर्वांचा विचार साहित्य करत असल्याचे दिसून येते. संमेलनात संविधानावरही चर्चा झाली. एकीकडे संविधानाचे पूजन केले जाते तर दुसरीकडे संविधानाची धज्जीयां उडवली जाते. आज संविधानाशी या राज्यातले सरकार, देशातील सरकार खेळत असल्याची स्थिती आहे. संविधान संपवण्याची भाषा केली जात आहे. म्हणून तरुणांची जबाबदारी असावी कि येणाऱ्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी लिहिलेले संविधान केवळ पाळले नाही तर ते मजबूत केले पाहिजे असा संकल्प अशा साहित्य संमेलनाच्या माध्यमातून होण्याची आवश्यकता असल्याचे मत विरोधी पक्षनेते आ. अंबादास दानवे यांनी केले.

**मसापकडून प्रत्येक साहित्याची दखल**

मराठवाडा साहित्य परिषदेचे अध्यक्ष कौतिकराव ठाले पाटील यांनी मराठवाडा साहित्य परिषदेची पार्श्वभूमी सांगत, साहित्य परिषदेचे सर्व उपक्रम जसे मराठी भाषेशी, वांग्मयाशी निगडित असतात तसेच जनतेच्या ज्वलंत प्रश्नांशीही निगडित असते असे सांगितले. याची नोंद मसाप घेत असते. किंबहुना मसाप हे समाजात निर्माण होणाऱ्या प्रश्नांच्या शोधात असते. यावर उत्तरे शोधत असते. हे करत असताना काहींची नाराजीही घ्यावी लागते. मात्र हे करावेच लागते. आणि म्हणून संमेलनांमध्ये स्फोटक विषय चर्चिले जातात. यात जोखीमही असते. यानुसार या संमेलनामध्येही जे विषय चर्चिले गेले ते उद्बोधक असण्यासोबतच अंगावर घेण्यासारखीही होती. हे संमेलनही एका अर्थाने स्फोटकतेच्या दिशेने गेलेले असल्याचे ठाले म्हणाले..

**बाल साहित्यिकांनी गाजवला बालकुमार मेळावा**

मराठवाडा साहित्य संमेलनात रविवारी बालकुमार मेळावा उत्साहात संपन्न झाला.या कोवळ्या कळ्या माजी लपले रवींद्र शिवाजी ह्या ग्रामगीतेतील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या ओवीची जणू प्रचितीच आली. हा मेळावा बाल साहित्यिकांच्या भन्नाट रचनांनी प्रचंड गाजला आणि या बाल साहित्यिकांची शब्द संपत्ती ऐकून उपस्थित जेष्ठ रसिकांनी भरभरून दाद दिली.

या मेळाव्यात अनेक बाल साहित्यिकांनी आपल्या कविता सादर करून उपस्थित जेष्ठ रसिकांना मंत्रमुग्ध केले. प्रसिद्ध साहित्यिक गेणू शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली हा मेळावा संपन्न झाला. सूत्रसंचालन सुप्रसिद्ध बालकवी गणेश घुले यांनी केले. श्री गुरुदेव सेवाश्रम ग्रामगीता अध्ययन केंद्र येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराज विचारपीठावर संपन्न झालेल्या या बाल मेळाव्याप्रसंगी बाल साहित्यकार श्रीपती जमाले, निशा कापडिया, विनोद सिनकर, संजय ऐलवाड, ललिता शिंदे, किरण निकम, संगीता देशमुख, आनंद पपूलवाड, भारती सोळुंके, प्रदीप इक्कर, अविनाश सोनटक्के आदि बालसाहित्यिकांची विचारपीठावर उपस्थिती होती. या संमेलनापूर्वी संपन्न झालेल्या आंतर शालेय काव्यवाचन स्पर्धेत वाळूज महानगरातील विविध शाळेतील तब्बल ६५ बालकवींनी सहभाग घेतला होता. मेळाव्याप्रसंगी प्रसिद्ध कवी संजय वरकड, बाल साहित्यकार वीरभद्र मिरेवाड (नांदेड) शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष आशा डांगे मराठवाडा साहित्य परिषदेचे सचिव गणेश मोहिते, कुंडलिकराव अतकरे संमेलनाचे स्वागताध्यक्ष विजय राऊत, मच्छिंद्र सोनवणे श्री गुरुदेव सेवा मंडळ मराठवाडा प्रांत सेवा अधिकारी मनीष जयस्वाल, विठ्ठल कांबळे, पंचायत समितीच्या माजी सभापती धनश्री कांबळे, श्री गुरुदेव महिला मंडळाच्या अध्यक्षा रेखा हिंगणकर, श्री गुरुदेव सेवा मंडळाचे सचिव राजाभाऊ देशमुख, संचालक गजानन मानकर, नरेश देशकर, भानुदास पळसकर, ज्ञानेश्वर धुर्वे, प्रमोद देशमुख, ज्ञानेश्वर दरेकर, केशवराव बुले, प्रमोद नाल्हे, विजय रोडे, गणेश पळसकर, संजय लव्हाळे, वैशाली गवई, संयोजन समितीच्या डॉ.नीलिमा काळे, संजय वैष्णव व त्यांचे सहकारी यांच्यासह श्री गुरुदेव सेवा मंडळ बजाजनगरचे पदाधिकारी व सेवक तसेच बाल साहित्य रसिक व पालकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सक्षम, समर्थ, कल्पक समाजाच्या निर्मितीसाठी संमेलनाला लागणारा निधी ही भांडवली गुंतवणूक - डॉ. श्रीपाद भालचंद्र जोशी

## वाचन चळवळीसाठी सर्व संस्थांचे एकत्रित प्रयत्न आवश्यक

**ज्योतिर्मय साहित्य**

**नागपूर –** साहित्य संमलने ही सुध्दा एक व्यापक चळवळ आहे. ही चळवळ युवकांनी निर्माण केलेली आहे. साहित्यामधून, वाचनातून भाषिक समाज समृध्द होत जातो. संमेलने हा या समृध्दीचा एक मार्ग आहे. संमेलनाची फलश्रुती ही कोणत्याही आर्थिक फुटपट्टीवर मोजता येणार नाही. संमेलनासाठी लागणारा निधी ही उद्याच्या सशक्त समाजासाठी, समाजाच्या कल्पकता वृद्धीसाठी, सहिष्णूतेसाठी, विवेकासाठी केलेली भांडवली गुंतवणूक आहे, असे श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी स्पष्ट केले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत दिल्ली येथे होणाऱ्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाच्या औचित्याने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या वतीने विविध साहित्यिकांशी संवाद साधला जात आहे. महाविद्यालयीन युवकांमध्ये वाचनाची अधिक गोडी निर्माण व्हावी यादृष्टीने जिल्हा माहिती अधिकारी विनोद रापतवार यांनी साधलेल्या



संवादात त्यांनी हे स्पष्ट केले. वाचनाचे माध्यम हे वैयक्तिक माध्यम आहे. मेंदुतील धिम्या लहरी वाचन करताना सक्रिय असतात. आकलनाला अवकाश त्यामुळे लाभतो, रसग्रहणाची प्रक्रिया त्यातून विकसीत होत राहते. वाचनाद्वारे आपल्या कल्पना शक्तीला, निर्मितीक्षमतेला चालना मिळते. आपण जे वाचतो त्यातील प्रतिमा विश्व मेंदूत साकारली जात असते. एक प्रकारे ही प्रक्रिया आपल्या निकोप मनासाठी अत्यंत आवश्यक असून लेखकासमवेत वाचकांना सहनिर्माता होण्याची संधी यातून मिळते, अशा शब्दात त्यांनी वाचनाचे महत्त्व अधोरेखित केले. सरणारी प्रत्येक पिढी ही नव्या पिढीला दोष देण्याच्या भूमिकेत आढळते. परंतु सर्वात जास्त अभिव्यक्ती ही युवा वर्गाकडूनच होत असते. ते चांगला विचार करतात. महाविद्यालयीन रंगभूमीला समृध्द करण्याचे काम याच मुलांनी केले आहे. मात्र असे असले तरी ही मुलं वाचनापासून दूर आहेत. त्यांना वाचनाच्या जवळ आणावयाचे असेल तर शालेय जीवनातच मुलांवर वाचनाचे संस्कार करणे क्रमप्राप्त असल्याचे त्यांनी सांगितले. याचबरोबर ज्या सार्वजनिक वाचनालयांनी महाराष्ट्रात काही वर्षांपूर्वी जी व्यापक चळवळ उभी केली, ती चळवळ गारठल्याची स्थिती आहे. जवळपास १२ हजार ५०० सार्वजनिक ग्रंथालये आज महाराष्ट्रात आहेत. साहित्य संस्था, सार्वजनिक ग्रंथालये,शासनाची ग्रंथालये यांनी पुनः स्वतःहून पुढे येत विविध उपक्रमांच्या माध्यमातून यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे त्यांनी सांगितले.

## लक्षवेधी छायाचित्र....



(पक्षी – ग्रे फ्रँकॉलीन ) काय बरं गहन विचारात असतील हे?

(छाया– संजय दारमवार, मुंबई )

# कविता देऊन केला वाढदिवस साजरा

**ज्योतिर्मय साहित्य**

**कुरखेडा –** मुळ गाव देऊळगाव येथील व सध्या कुरखेडा येथे वास्तव्यास असणाऱ्या प्रसिद्ध साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता संतोष ठलाल आपल्या वाढदिवसाच्या निमित्ताने दरवर्षी गोर-गरीब, दिव्यांग, आदिवासी लोकांपर्यंत, शाळेत, दवाखान्यात व इतर ठिकाणी जाऊन भेट देत असतात आणि आवश्यक असलेले साहित्य दान करत असतात. आजकाल पाळीव पशु प्राण्यांचे महत्व कमी होत आहे त्यांच्या प्रती आपुलकी कमी दिसत आहे. याच वास्तव परिस्थितीवर आधारित मुक्या पशू प्राण्यांच्या व्यथा, वेदना सांगणारी व समाजप्रबोधन करणारी ‘‘आमच्यावर थोडी दया करा‘‘ शीर्षक असलेली व




दै.नवराष्ट वृतपत्रात प्रकाशित झालेल्या कवितेचा बॅनर बनवून पशुवैद्यकीय तालुका अधिकारी कार्यालयाला कविता दान केली. त्यावेळी समाजप्रबोधन करणाऱ्या या पुण्य कार्यावर पशुवैद्यकीय अधिकारी देवेंद्र मेश्राम, सेवानिवृत्त प्रा. अशोक बोरकर, सेवानिवृत्त शिक्षक शामराव सोनुले यांनी आपले मनोगत व्यक्त करून साहित्यिक, सामाजिक कार्यकर्त्या संगीता ठलाल यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. त्या प्रसंगी उपस्थित असलेले आदर्श शिक्षिका मिनाताई दवंडे, सुनिता दखणे, रेखा मोहणे, ईश्वर ठाकरे, दै.लोकमतचे ता.पत्रकार सिराज पठाण, अंकूश उईके, पशुवैद्यकीय कार्यालयातील कर्मचारी व लाभार्थी उपस्थित होते. सर्व मान्यवरांनी संगीता ठलाल यांच्या सामाजिक उपक्रमाची प्रशंसा केली व वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या, त्यावेळी संगीता ठलाल यांनी सर्व उपस्थित मान्यवरांचे धन्यवाद मानले.आणि या कार्यक्रमाचे आभार सेवानिवृत्त शिक्षक नरहरी माकडे यांनी मानले.



– विद्यावाचस्पती विद्यानंद
Mobile: +917709612655
Email: vidyavachaspati.vidyanand@gmail.com



आनंदी पहाट...


## सधन होण्याचे साधन महत्वाचे

**ज्योतिर्मय साहित्य**

घरगुती बचत हा विषय सर्व परिचित आणि तरीही अनेकदा दुर्लक्षित राहणारा असल्याचं दिसून येतं. घरगुती बचत करणं खरं तर अगदी कोणालाही सहज शक्य होऊ शकतं. त्यासाठी काटकसर करणं हा काही समाधानकारक पर्याय होत नाही. आपल्या दैनंदिन गरजा यथायोग्य भागवून देखील ठराविक रक्कम आपण बचतीसाठी शिल्लक ठेवू शकतो अथवा ती बाजूला काढून ठेऊ शकतो. यासाठी सहज शक्य होणारी काही पथ्य आपण पाळू शकतो. आपल्या हाती असलेली रक्कम एकाच ठिकाणी न ठेवता थोडी-थोडी करून वेगवेगळी ठेवल्यास खर्चासाठी नेमके किती पैसे आपल्याकडे आहेत याचा हिशेब आपण करत बसत नाहीत किंवा करण्यासाठी तेवढा वेळ देऊ शकत नाही. अशावेळी हाती लागणाऱ्या एकाच ठिकाणच्या पैशाचा वापर आपल्याकडून होतो आणि इतरत्र ठेवलेली रक्कम शिल्लक राहते. सद्य:स्थितीत अनुभवायला येणाऱ्या घरफोड्या अथवा भुरट्या चोऱ्या यापासून देखील आपलं मोठ्ठे नुकसान टळू शकतं. कारण आपण एकाच ठिकाणी एक रकमी पैसे ठेवणं टाळणार आहोत.

स्वत:जवळ असलेल्या पैशातून नेहेमी केवळ मोठ्या नोटा खर्चासाठी वापराव्यात. आणि लहान नोटा बाजूला ठेवून द्याव्यात. जसे दहा रुपयांच्या आपल्याजवळ येणाऱ्या नोटा शक्यतो खर्च न करता राखून ठेवाव्यात आणि गरजेप्रमाणे नेहेमी पन्नास, शंभर, दोनशे, पाचशे अथवा दोन हजारच्याच नोटा वापराव्यात. असं करण्यामुळे आपसूकच प्रत्येक दहाची नोट राखून ठेवली जाते आणि एकप्रकारे बचतच होते. ''पैसा हे साधन आहे, निश्चितच ते साध्य असू नये'' हे जरी सत्य असलं तरीही ते साधन साध्य करण्यासाठी विविध साधनं कशाप्रकारे वापरावीत हे समजून घेणंही सद्य:स्थितीत तितकेच आवश्यक आहे.

## धन्यवाद हो धन्यवाद...




**ज्योतिर्मय साहित्य**


( माझ्या आनंदनिधान या पुस्तकातून )

''होम मिनिस्टर'' नावाचं एक धारावाहिक आहे. टीव्ही वर सुरु असणाऱ्या या शोचा आनंद भगिनी वर्ग मोठया प्रमाणात घेताना आढळून येतो. ''भाऊजी'' या नावाने लोकप्रिय असणारे आदेश बांदेकर या शोचे अतिशय कुशल आणि सहज संचालन करतात. अर्थात मला तुमच्याशी या शोबद्दल बोलायचं नाही. पण या शोमध्ये आदेश बांदेकर एक प्रश्न हमखास विचारतात. तो माझ्या दृष्टीने महत्वाचा आहे. ते म्हणतात, वहिनी, आभार मानायचे तर कोणाचे मानाल किंवा धन्यवाद द्यायचे तर कोणाला द्याल ? मग ती भगिनी आपल्या माहेरचे, सासरचे किंवा आणखी कुणा व्यक्तीचे आभार मानते किंवा धन्यवाद देते. दुसऱ्या शब्दात सांगायचं तर ती त्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करते.

याचं तात्पर्य असं की आपल्या जीवनात घडलेल्या चांगल्या गोष्टींबद्दल, यशाबद्दल कोणाची तरी मदत आपल्याला झालेली असते. आपण मिळवलेलं यश किंवा केलेली प्रगती ही एकट्याची असू शकत नाही. आपण एकटे त्याचे श्रेय घेऊ शकत नाही. म्हणून आजच्या परिस्थितीत या यशाच्या पायरीपर्यंत पोहोचताना आपल्याला अनेक लोकांची मदत झालेली असते. त्या सगळ्या व्यक्तींबद्दल कृतज्ञता व्यक्त करणं, त्यांचे आभार मानणं वा त्यांना धन्यवाद देणं हे आपलं आद्य कर्तव्य. आपण तसं केलं नाही तर आपण कृतघ्न ठरू.




आचार्य अत्रे यांनी एके ठिकाणी लिहून ठेवलं आहे की, उद्या माझी समाधी बांधायची झाली तर तिच्यावर एक वाक्य लिहून ठेवा. ते असं की हा माणूस मूर्ख असेल, अविचारी असेल पण कृतघ्न कधीच नव्हता. कृतज्ञ असण्याबद्दलचा महिमा इतक्या सुंदर शब्दात क्वचितच कोणी सांगितला असावा. अनेक साधू, संत, निरनिराळे उपासना संप्रदाय आपल्यला जे काही मिळाले आहे त्याबद्दल कृतज्ञ राहण्यास सांगतात. तुकाराम महाराजांच्या काळात मोठा दुष्काळ पडला होता. त्या दुष्काळात त्यांचे जवळचे आप्त हे जग सोडून गेले. त्यांच्या सावकारी धंद्याचे तीन तेरा वाजले. पण ते परमेश्वराला म्हणतात बरे झाले देवा निघाले दिवाळे, बरी या दुष्काळे पीडा केली. अनुतापें तुझे राहिले चिंतन, झाला हा वमन संसार. केवढी अपरिमित श्रद्धा तुकाराम महाराजांची परमेश्वरावर ! अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या जागी दुसरी कोणीही व्यक्ती असती तर परमेश्वराला बोल लावला असता. पण ते तुकाराम महाराज आहेत. श्रीकृष्णाचा परम सखा सुदामा, श्रीकृष्णाची आत्या कुंती हे तर विपरीत परिस्थितीत त्याचे धन्यवाद मानून त्याची भक्ती करीत होते. कुंतीने तर त्याला तुझा क्षणभरही विसर न होवो म्हणून आपल्याला कायम दुःखात ठेव अशी जगावेगळी मागणी मागितली. आपण तर सामान्य माणसं ! आपल्यात तेवढी हिंमत नाही म्हणण्याची की मला दुःख किंवा विपरीत परिस्थितीत ठेव. पण आपल्याला जे काही मिळालं आहे तेही खूप आहे. त्याबद्दल तरी आपण त्याचे आभार मानायला हवेत. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६


## कुविद्या लक्षणे

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

२) आशा, ममता, तहान, भुक, कल्पना, चिंता, अहंता, कामभावना, आसुया अविद्या ईषणा, वासना, अत्याचार, लोलंगता. ईच्छा, वांच्छा, चिकित्सा, निंदा अनिती, गुंडगिरी, सदैव मस्ती, ताठा, तोरा, अभिमान, अवज्ञा, विपत्तीआपदा, दुबुध्दी, दुर्वासना. स्पर्धा, खटपट अस्वस्थता, स्वभावातील तर्हे वाईकपणा, वटवट, सदानकदा कुठल्याही गोष्टींची तक्रार करण्याची सवय, कोणतेही काम ऊलटे सुलटे करण्याची सवय तसेच लडाथडा काम करून मोकळे होणे त्यात प्रेम, माया, जिव्हाळा याचा अभाव असतो. कुविद्याचा माणूस आळशी व रोगी असतो. अतिशय कंजूस स्वभावाचा असतो.खादाड, दुबळा, फटकून वागणारा, अतिशय लबाड असतो. तापट स्वभाव, वेडपट, वाचाळ, खोटा, नुसताच वाचाळवीर कोणतेही काम धड निटपणे करत नाही तर दुसरा कलतो तर त्यालाही करू देत नाही. एखादी व्यक्ती चांगले काम करते तर ते त्याला धडपणे करू देत नाही. स्वतः शिकुन शहाणा होत नाही. कोणतेही काम अभ्यास पूर्ण, निरिक्षणाने करावे अशी त्याची ईच्छा नसते.

अज्ञानी अविश्वास, भलभलते अर्थ काढणारा तर समोरचा कसा चुकीचा आहे म्हणून अशांत क्रुत्ये करणारा वेडा व लंपट असतो. स्वतः अभक्त असुन खर्या भक्ताचा द्वेश करणारा असतो. पापी, निंदक, स्वतः दुःखी असुन दुसऱ्या चा घात करणारा असतो. अतिशय निर्दयी असतो. तो हिन देहाचा असुन मोठा दांभिक व दुराभिमानी असतो. कोणत्याही गोष्टीकडे सरळ न बघता फक्त कुरापत काढत बसतो. अर्थहिन बडबडणारा स्वतः दुदैवी पण इतरांना ज्ञान सांगणारा असतो. तो भित्रा असुन खोटा डौल मिळवणारा असतो.**(क्रमशः)**



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

## नामाचे प्रेम नामाच्या सहवासाने येईल

**ज्योतिर्मय साहित्य**

नामात प्रेम येण्यासाठी आपल्या प्रेमळ आईकडेच बघा. मुलाला जरा ताप आला तरी आईच्या पोटात धस्स होते अन्न गोड लागत नाही अशा अनेक गोष्टी होतात. थोडक्यात म्हणजे तिला सर्व बाजूंनी अस्वस्थता उत्पन्न होते. नाम घेण्यात थोडा व्यत्यय आला तर आपली स्थिती तशी होते का याचे उत्तर आपल्याला स्वत:कडूनच मिळण्यासारखे आहे. नाम घेणे हा माझा धर्म आहे ते माझे आद्य कर्तव्य आहे त्याच्याशिवाय जगणे म्हणजे मेल्यासारखेच आहे नाम घेण्यात माझे आत्यंतिक हित आहे किंबहुना मी नामाकरिताच जन्माला आलो आणि तद्रूपच होऊन जाईन इतक्या प्रज्वलित भावनेने नाम घेणे जरूर आहे आणि मग प्रेम आले नाही ही गोष्ट शक्यच नाही. प्रेम येत नाही याचा अर्थच हा की आम्ही नाम खर्या आस्थेने घेत नाही. ह्या सर्वांवर उपाय म्हणजे घेण्याच्या निश्चयाने ते जसे येईल तसे घेत राहणे. तेच नाम आपल्याला एक एक पाऊल पुढे नेऊन ध्येय गाठून देईल. परिस्थिती चांगली आली म्हणजे नाम घेईन असे म्हणणारा मनुष्य नाम कधीच घेत नाही.

नाम हे मनात किंवा उच्चार करूनही घेता येते. नामात राहावे म्हणजे अंत:करणाची शुध्दता होईल आणि अंत:करण शुध्द झाले की भगवंताचे प्रेम येईल. नुसत्या पुष्कळ जपापेक्षा विवेकाने आणि विचाराने आलेले प्रेम नामात असणे जरूर आहे. खरे म्हटले म्हणजे नामांतच नामाचे प्रेम आहे. ताकात लोणी असतेच, फक्त ते वर दिसत नाही पण ताक घुसळल्यावर जसे ते वर येते तसे भगवंताचे नाम आपण घेतले की त्याचे प्रेम आपोआप वर येते. साध्या शब्दांचादेखील आपल्या वृत्तिवर परिणाम होऊन तो तो भाव आपल्या मनात जागृत होतो मग भगवंताच्या नामाने भगवंताचे प्रेम का येणार नाही ? आज तुम्हाला जेवढा वेळ रिकामा मिळतो तेवढा सगळा भगवंताच्या नामात घालवण्याचा प्रयत्न करा. पुष्कळ दिवस एका घरात राहिल्याने त्या घराविषयी आपल्याला प्रेम येते ना ? प्रपंचाचे प्रेम आपल्याला सहवासाने आले आहे. तसे नामाच्या अखंड सहवासाने त्याचे प्रेम आपोआपच येईल. उठता बसता चालता बोलता आपण अनुसंधान ठेवण्याचा प्रयत्न करावा. कोणतेही व्यसन कालांतराने पचनी पडते आणि मग मनुष्य जास्त जास्त त्याच्या आधीन जातो. अफूचे पहा दिवसेंदिवस त्या माणसाला जास्त अफू लागते. त्याप्रमाणे भगवंताच्या चिंतनाचे आपल्याला व्यसन लागले पाहिजे. कोणतीही चांगली गोष्ट साधायला कठीण असणारच; पण अगदी थोडया श्रमात पुष्कळ साधून देणारे नामासारखे दुसरे साधन नाही. म्हणून नेहमी मनाने नाम घेत असावे.

संस्कृती व संस्कार



विभावरी कुलकर्णी,
मो. ८०८७८१०१९७



## 'स्व' विकसित करण्यासाठी झोप

**ज्योतिर्मय साहित्य**

विचार थोडा विचित्र वाटतो. कारण स्वत:ला विकसित करण्यासाठी आपण वेगवेगळे प्रयत्न करत असतो. ते सगळे प्रयत्न जागृत असताना करत असतो. या सगळ्यासाठी आपल्याला वेळ लागतो. कारण बरेचदा आपल्याला जो विकास आवश्यक वाटतो त्यासाठी मन तयार नसते. परंतु आपल्याला आवश्यक सूचना आपण झोपेच्या अवस्थेत मेंदूला देऊ शकतो. आपण झोपलो तरी मेंदू कार्यरत असतो. आणि जागृत अवस्थेत जे विरोधी विचारांचे जे अडथळे असतात, ते झोपेत नसतात. झोपेत आपण मेंदूला ज्या सूचना देतो त्या सूचना मेंदू ग्रहण करत असतो. म्हणजेच हा झोपेचा काळ आपण स्वत:ला विकसित करण्यासाठी वापरु शकतो. याच्या सूचना वयानुसार वेगळ्या असतात.

१) वय ० ते २ वर्षे –

या वयातील बालकांना बाळ झोपलेले असताना स्वतःच्या आवाजात प्रार्थना ऐकवाव्यात. आईने स्वतःच्या आवाजात अंगाई ऐकवावी. बाळाला ते सुरक्षित, आनंदी असल्याचे सांगावे.

२) वय २ ते ७

या वयातील मुलांना झोपेत आवश्यक त्या सूचना द्याव्यात. त्यांची भीती घालवण्यासाठी सूचना द्याव्यात. त्यांच्या नको असलेल्या सवयी बदलण्या साठी सूचना द्याव्यात. संस्कार प्रार्थना, श्लोक, मंत्र ऐकवावेत.

३) वय ८ ते १४

या वयातील मुले बरेचदा मोठ्यांच्या म्हणण्याला विरोध करतात. शिक्षक व मोठी माणसे यांचे बोलणे दुर्लक्षित करतात. मित्रांचे म्हणणे आवडते. अशा वयात ज्या सूचना मुले जागेपणी ऐकत नाहीत त्या सूचना मूल झोपल्यावर त्यांच्या कपाळावर हात ठेवून सांगाव्यात. म्हणजे त्या सूचना मेंदूत खोलपर्यंत पोहोचतात. आणि त्यांच्या वर्तनात अपेक्षित बदल होतात.

४) वय ८ ते २१

या वयात अभ्यास वाढतो. बाहेरील प्रलोभने वाढतात. अभ्यास लक्षात ठेवणे अवघड असते. अशा वेळी पालकांनी योग्य त्या सूचना द्याव्यातच. आणि अभ्यासाचा अवघड भाग लक्षात राहण्यासाठी अवघड भाग झोपताना व झोपेतून उठल्यावर वाचावा. म्हणजे तो अवघड अभ्यास लक्षात राहण्यासाठी मदत होते.

५) सर्वांसाठी

झोपण्यापूर्वी प्रार्थना ऐकावी. चांगल्या विचारांची चर्चा करावी. आनंदी व सकारात्मक विचारांचे चिंतन करावे. दीर्घ श्वसन करावे. शांत व मंद संगीत ऐकावे.



## नीतिशतक निरूपण

अनुवाद आणि निरूपण
ह.भ.प.चंद्रहास शास्त्री सोनपेठकर

**ज्योतिर्मय साहित्य**

**सच्चरितः सती प्रियतमा स्वामी प्रसादोन्मुखः**
**स्निग्धं मित्रमवञ्चकः परिजनो निष्क्लेशलेशं मनः ।**
**आकारो रुचिरः स्थिरश्च विभवो विद्यावदातं मुखं**
**तुष्टे विष्टपकष्टहारिणि हरौ सम्प्राप्यते देहिना ।।**

अर्थ – ज्याचेवर विश्वाचे कष्ट दूर करणारे भगवान श्रीहरी प्रसन्न होतात, त्या देहधारी मनुष्याला सदाचारी पुत्र, प्रियतमा पत्नी, प्रसन्नमुख स्वामी, स्नेहार्द्र सखा, फसवणूक न करणारे सेवक, क्लेशरहित मन, सुंदर रूप, सुस्थिर ऐश्वर्य आणि ज्ञानाने शुद्ध झालेले वदन म्हणजे मुख प्राप्त होते.

सांसारिक सुख कशास म्हणावे? कोण संसारी पुरुष सुखी आहे, असे मानावे? या विषयी भर्तृहरी प्रतिपादन करतात. सदाचारी पुत्र, प्रियतमा भार्या, प्रसन्न मालक, प्रेमळ सखा, निष्ठावान सेवकगण, क्लेशरहित मन, सुंदर रूप, स्थिर वैभव, ज्ञानशुद्ध वदन ही सुखी माणसाची लक्षणे या ठिकाणी कवीने प्रतिपादित केली आहेत. ही वरदाने माणसाला भगवान श्रीहरी विशेष प्रसन्न झाले असता, देत असतात, असे भर्तृहरी येथे सांगतात.



आरोग्य संजीवनी

## ध्यान

**ज्योतिर्मय साहित्य**

१. ध्यान आपल्याला मानसिक सशक्त बनवते, ज्यामुळे आपण कोणत्याही परिस्थितीत प्रसन्न राहू शकतो.

२. आपल्याला आंतरीक शांती प्राप्त होते आणि आसपासच्या परीस्थितीवर प्रभाव करू शकतो.

३. भावनिक लवचिकता वाढते.


४. प्रतिक्रिया व्यक्त करणे कमी होते. प्रतिसाद देण्याची क्षमता वाढते.

५. हा मनाला ताण-तणाव मुक्त कारण्याचा मार्ग आहे

शांत परिसर- शांत परिसरामध्ये ध्यान करणे योग्य. यामुळे अडथळे दूर होऊन, तुम्ही ध्यानामध्ये खोलवर जाऊ शकता.

नियमित ध्यान करा – दिवसातून दोनवेळा सातत्याने ध्यान करणे उत्तम. यामुळेच प्रत्येक दिवसागणिक तुम्हाला ध्यानाचे सकारात्मक प्रभाव जाणवू लागतात.

साथीदारांसह ध्यान करा – आपल्या जवळच्या साथीदारांच्या सोबत समुहाने ध्यान करा, यामुळे तुमचे अनुभव सखोल बनतील, शिवाय तुम्हाला सातत्य ठेवणे मदतीचे होईल.



ध्यानापुर्वी हलके शारीरिक व्यायाम करा यामुळे शरीरातील विविध अवयवांमधील ताण आणि तणाव निघून गेल्याने आरामदायी व्हाल आणि ध्यान आणखी आनंददायी बनेल.

विचारांचे निरीक्षण करा – विचारांना रोखण्याचा प्रयत्न करू नका. त्यांना येऊ द्या. त्यामुळे ध्यान विनासायास बनेल.

घाई करू नका – दहा-पंधरा मिनिटांचे ध्यान होतेय नां पहा. डोळे उघडण्यासाठी घाई करू नका.

***

संकलन –
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क – ९२ ७१ ६६९ ६६९

॥ श्री स्वामी समर्थ ॥





**ज्योतिर्मय साहित्य**

मी म्हणतात – पावसाचे थेंब छोटे जरी असले तरी त्याचे सतत पडत राहणे हे एका मोठ्या नदीला जन्म देतात त्याच प्रकारे रोजचे पाठवलेले छोटे-छोटे सूविचार जीवनात मोठे परिवर्तन घडवू शकतात.. ''सुख'' फुलासारखं असावं जे दररोज उमलत रहावं... ''दुःख'' हे गळणाऱ्या पानासारखं असावं जे क्षणात निघून जावं...

स्वामी म्हणतात – समजूत घालायला कुणी नसलं की स्वतः लाच बळ आणावं लागत !! ज्यांचे डोळे चांगले ते जगाच्या प्रेमात पडतात, पण ज्यांची जीभ गोड असेल तर जग त्यांच्या प्रेमात पडते...! एक व्यक्ती म्हणून मोठं होताना, कधीही माणूस म्हणून छोटे होऊ नका...

# रवींद्रनाथ टागोर





विश्वास देशपांडे,
चाळीसगाव
मो. ९४०३७४९९३२

## रवींद्रनाथ टागोर : वारसा आणि कार्य

**ज्योतिर्मय साहित्य**

(मागील अंकावरून)

शहरी आणि ग्रामीण भागातील लोकांमध्ये जे अंतर पडले आहे, ते या साहेबांच्या भाषेमुळेच असे त्यांचे मत होते. इंग्रजी भाषा ही बंगालमधील बाबू लोकांची म्हणजे शहरी आणि सुशिक्षित लोकांची भाषा होती. इंग्रजांनी त्यांच्यासाठी जी शिक्षणाची व्यवस्था केली होती त्यातून शरीराने भारतीय पण मनाने इंग्रज असे लोक तयार व्हावेत हा त्यांचा उद्देश होता. असे लोक त्यांना राज्यकारभार चालवण्यासाठी हवे होते.

इंग्रजी शाळेतील दिले जाणारे हे शिक्षण म्हणजे बंदिस्त खोलीतील सूर्यप्रकाशासारखे होते. चार भिंतींच्या आड कोंडून ठेवलेला प्रकाश जसा बाहेर जात नाही, तसे हे शिक्षण शहरी सीमांचा उंबरठा ओलांडून ग्रामीण भागापर्यंत पोहोचू शकत नव्हते. किंबहुना ग्रामीण भागाचा कोणी विचारच केला नव्हता. शेतकऱ्यांच्या या देशात शेतकरी निरक्षरच राहिला होता. त्याच्यापर्यंत शिक्षण पोहोचवण्याची कोणाचीच इच्छा दिसत नव्हती. त्यातूनच शहरी आणि ग्रामीण भागात एक मोठी दरी निर्माण होत चालली होती. खरा भारत समजून घ्यायचा असेल, तर तो शहरात नसून ग्रामीण भागात वसलेला आहे असे त्यांना वाटे.

इंग्रजी भाषेबद्दल रवींद्रनाथांच्या मनात द्वेष होता असे नाही. पण शिक्षणाचे माध्यम मातृभाषाच असावं असं त्यांना वाटायचं. इंग्रजी भाषा कितीही चांगली असली आणि तिला वाघीणीचं दूध म्हटलं जात असलं तरी कोणतीही गोष्ट अति झाली की त्याची माती होते. ते आवश्यक तेवढेच हवे. दूध मग ते वाघिणीचे असो वा गायीचे, अति झाले की त्याचे विषच होणार.

आपण ज्या वातावरणात वाढतो, ज्या भाषेत बोलतो, ऐकतो, ज्या भाषेत गाणी ऐकतो, नाटक सिनेमा पाहतो, तीच भाषा शिक्षणाचं माध्यम असावी. इंग्रजीसारखी परकी भाषा मुलांच्या कल्पनाशक्तीला आणि विचारशक्तीला वाव देऊ शकत नाही. जी भाषा आजूबाजूला बोलली जाते, त्या भाषेचे संस्कार मुलांच्या मनावर सहज होतात. त्यांच्या डोळ्यांपुढे सहजपणे चित्र उभे राहते. इंग्रजी भाषेतील निसर्गकवी वर्डस्वर्थ याची डॅफोडिल्स ही कविता सुंदर आहे. पण आपल्या मुलांना डॅफोडिल्स कुठे माहिती आहेत ? ती त्यांनी कधी पाहिली तरी का ? मग त्यांचे चित्र त्यांच्या डोळ्यासमोर उभे तरी कसे राहणार ? इंग्रजी माध्यमाला प्रतिष्ठा मिळाल्यामुळे साध्या, सहज आणि सोप्या मातृभाषेतील शिक्षणाला मुले वंचित झाली. झाडाची जी मुळे जीवनरस झाडापर्यंत पोहोचवतात, ती मुळेच उखडून टाकण्याचा हा प्रकार आहे. मग झाडाची निकोप वाढ कशी होईल ?

भाषेसंबंधी बोलताना रवींद्रनाथ आणखी एक महत्त्वाचा विचार मांडतात. तो म्हणजे भाषा केवळ ती नव्हे की जी फक्त शहरी लोक बोलतात. त्या भाषेच्या उपभाषा त्याचप्रमाणे ग्रामीण भागात बोलली जाणारी बोलीभाषा या सगळ्या प्रकारच्या भाषा त्यांना मान्य होत्या. आपल्या महाराष्ट्रात सुद्धा मुंबई पुण्यात बोलली जाणारी मराठी भाषा साधारणपणे आपण प्रमाण मानतो आणि ग्रामीण भाषेला अशुद्ध म्हणून नावे ठेवतो. परंतु रवींद्रनाथांचे बंगाली भाषा आणि तिच्या इतर उपभाषा आणि बोलीभाषा यांच्यासंबंधातील हे मत पाहिल्यानंतर आपल्याला सुद्धा आपण आपल्या बोलीभाषांबद्दल चुकीचा समज करून घेतला आहे हे लक्षात येते. बहिणाबाईसारख्या निरक्षर असलेल्या कवयित्रीच्या कविता अहिराणी भाषेत आहेत पण त्या जीवनाचं तत्वज्ञान किती सहज सांगून जातात हे आपण सगळे जाणतो. ग्रामीण भाषा, बोलीभाषा हे आपले वैभव आहे. भाषेतील केवळ उच्चाराच्या आणि शुद्धाशुद्धतेच्या कल्पना रवींद्रनाथांना फारशा मान्य नव्हत्या. तसे पाहिले तर त्यांनी व्याकरणशास्त्राचा सखोल अभ्यास केला होता. त्यांच्यासोबत असणारे त्यांचे सहकारी विधुशेखर शास्त्री हे व्याकरणात पारंगत होते. त्यांच्यासोबत बसून त्यांनी पाणिनीचे व्याकरणशास्त्र अभ्यासले होते. **(क्रमश:)**

# पर्यावरण पूरक कापडी पिशवी

कल्पना दिलीप मापूसकर
मीरा रोड

साधारणपणे १९६५ च्या काळापर्यंत पाहायला गेलंच तर घराबाहेर पडताना रुमाल, पाकीट, सोबत एक कापडी पिशवी अवश्य असायची. येता येता भाजी, फळं, छोटसं वाणसामान इत्यादी आणण्यासाठी. अगदी रेशन किंवा महिन्याचं वाण समान भरायचे असेल तर वेगवेगळया पिशव्या वर्गवारी केलेल्या असायच्या; म्हणजे साखरेला, तांदूळ, गहु साठी पिशव्या. बाकी छोटं छोटं समान खाकी रंगाच्या कागदी पिशवीतून वाणी देत असे. त्याहून कमी सामान वर्तमानपत्राच्या कागदातून पुडी बांधुन दिलं जायचं. या कापडी पिशव्या सुद्धा अगदी साध्या नसत बरं का...!! काठाने त्रिकोणी आकाराची पट्टी लावून आकर्षक बनवलेल्या असायच्या. आकारात सुद्धा विविधता; गोल, चौकोनी, झबला, लंबाकृती, चंची प्रकारात इत्यादी. माझ्या घरी तर माझा फ्रॉक जुना झाला की विविध आकार देवून हात शिलाई करून आई पिशव्या बनवत असे. काही प्राथमिक शाळेतील मुलं दप्तर म्हणून पण अश्या घरगुती पिशव्या वापरत असत. अशी ही मजबूत, टिकावू, पर्यावरणाला पूरक पिशवी आज ग्लोबल युगातून हद्दपार झाली आहे.

हळुहळू हा काळ केव्हा व कसा मागे पडत गेला हे नक्की आठ्वत नाही. हो; पण का पडला...!!याला कारण म्हणजे प्लास्टिकच्या वस्तूंचं वाढलेल आक्रमण हे होय. या प्लास्टिकने तर सर्वत्र उच्छादच मांडला. काचेच्या बाटलीतून मिळणारे दूध बंद झाले. लोकं हळुहळु कापडी पिशव्या बाळगणं विसरून गेले. घन पदार्थांपासून ते अगदी द्रव्य पदार्थांपर्यंत सगळीकडे प्लास्टिक आपली आक्रमकता दाखवू लागला. हॉटेलमधून भाजी सुद्धा आता प्लॅस्टिक कंटेनर्स मधून मिळते, चार ते पाच कप चहा आणायचा असल्यास तोही प्लास्टिक पिशवीतून काहींच्या हातातून आणताना दिसतो. थंड पदार्थ ठिक आहेत हो; पण गरम चहा, गरम भाजी इत्यादी प्लास्टिकशी प्रक्रिया होऊन मूळ पदार्थ प्रदूषित होण्याची प्रक्रिया होते आणि तेच अन्न आपण रोज सेवन करत असतो. हे प्रकृतीला किती घातक आहे हा सूक्ष्म पण योग्य विचार कोणीच करत नाही.

आजचे कॅन्सर सारखे वाढत चाललेले विकार निश्चितच आपल्या प्लास्टिक जीवनशैलीचा एक भाग आहे. आयतं ही आजच्या पिढीची मानसिकता झाली आहे. लोकांना घरून बॅगेत



कापडी पिशवी घेऊन जाणं का जमत नाही ? पुर्वी काचेच्या बाटल्यांमधून दूध विक्री होत असे बाटल्या परत देऊन दुसर्या घेतल्या जायच्या. आजही गरम जेवणाच्या डब्बा आपण अश्या द्या व घ्या पद्धतीने अमलात आणू शकतो किंवा डब्याचे पैसे भरायचे डिपॉझीट तत्त्वावर आणि डबा परत केल्यावर ते मिळवायचे.

नवं ते हवं असलं तरी जुनं ते सोनं नेहमीच असतं ते काय खोटं नाही.

***

# प्राजक्ताचा वेगळा अंदाज

**ज्योतिर्मय साहित्य**

अभिनय, नृत्य व निर्माती अशा विविध भूमिकेतून अभिनेत्री प्राजक्ता माळीने स्वत:ची वेगळी ओळख निर्माण केली आहे. काहीतरी नाविन्यपूर्ण करण्याचा प्रयत्न प्राजक्ता नेहमीच करत आली आहे. आगामी 'चिकी चिकी बुबूम बुम' या चित्रपटात ती रावी या मुलीची भूमिका साकारताना दिसणार आहे. रावी ही अतिशय चुलबुली आणि उत्साही आहे पण त्याचवेळी ती गोंधळलेली सुद्धा आहे. विनोदाचा वेगळा बाज असलेली ही चॅलेंजिंग भूमिका प्राजक्ता साकारत आहे. रियुनियनच्या सेलिब्रेशनसाठी एकत्र जमलेल्या पण काही विचित्र गोष्टींमुळे कचाट्यात सापडलेल्या मित्रांची धमाल गोष्ट म्हणजे चिकी चिकी बुबूम बुम' हा चित्रपट. धमाल, मस्ती, हास्याचे स्फोट उडवत २८ फेब्रुवारीला चिकी चिकी बुबूम बुम' प्रेक्षकांना विनोदाची मेजवानी देणारआहे.

'कसलेल्या विनोदी कलाकारांसोबत काम करण्याची संधी हे माझ्यासाठी खूप खास होतं. माझ्या आजवरच्या भूमिकांना प्रेक्षकांनी चांगला प्रतिसाद दिला असून चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटातील माझ्या भूमिकेचं प्रेक्षक नक्कीच स्वागत करतील' असा विश्वास प्राजक्ता व्यक्त करते.



प्राजक्ता माळी सोबत स्वप्नील जोशी, प्रार्थना बेहरे, प्रसाद महादेव खांडेकर, रोहित माने, प्रथमेश शिवलकर, नम्रता संभेराव, वनिता खरात, सचिन गोस्वामी, ओंकार राऊत, प्रियदर्शनी इंदलकर, अभिजीत चव्हाण, निखिल रत्नपारखी, प्रभाकर मोरे, चेतना भट, निखिल बने, श्याम राजपूत, ऐश्वर्या बडदे, श्लोक खांडेकर, प्रमोद बनसोडे या कलाकारांची फौज 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटात हास्याचे फवारे उडवत रंगत आणणार आहेत.

नारकर फिल्म्स अँड एंटरटेनमेंट निर्मित, आयडियाज द एंटरटेनमेंट कंपनी प्रस्तुत आणि स्वर्ण पट कथा आणि प्रजाकार प्रोडक्शन्स यांच्या सहयोगाने येणाऱ्या 'चिकी चिकी बुबूम बुम' चित्रपटाचे दिग्दर्शन प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. चित्रपटाचे निर्माते सुनील नारकर असून सहनिर्माते सेजल दिपक पेंटर आणि प्रसाद महादेव खांडेकर आहेत. चित्रपटाचे लेखन प्रथमेश शिवलकर, प्रसाद महादेव खांडेकर यांचे आहे. छायांकन गणेश उतेकर यांचे आहे.

***

# आचरणात आणण्यासारखे खूप काही

**ज्योतिर्मय साहित्य**

मधुकर ए.निलेगावकर,
पुणे
९४२१३७५६९१



तसं पाहिलं तर जबाबदारी आणि ओझं या दोन्ही शब्दात खूप फरक आहे. कोणत्याही गोष्टीची जबाबदारी घेतल्याशिवाय माणसाला त्याबाबतीतील महत्त्व कळत नाही. तसेच, त्याची जाणीवही होत नाही. ओझं म्हणजे, वजनदार वस्तू उचलणे, हे माणसाला ओझं वाटतं. तसेच, इच्छा नसताना नाखूषीने एखादं काम माणसाला करावं लागत असेल तर, त्या कामाचं माणसाला ओझं वाटतं. कोणतं काम इच्छेने करायचं आणि कोणतं काम अनिच्छेने करायचं हे माणूस ठरवत असतो. माणूस या संज्ञेत स्त्री व पुरुष दोघेही येतात. सध्याच्या काळात घरची व बाहेरची कामं करणे ही दोघांचीही जबाबदारी झालेली आहे.आत्तापर्यंत स्त्री ही घरातलीच कामे करीत असे. ब-याच कुटुंबात महिला स्वखूषीने, तर काही कुटूंबात महिला जबाबदारी म्हणून नोकरी करताना दिसतात. त्यात, मुलामुलींचे व वृध्द लोकांचे संगोपन करणेची जबाबदारी त्यांच्यावर येते. ती बहीण भाऊ, पतीपत्नी, भाऊ भाऊ व ईतर सर्व नातेवाईक एकमेकांना मान देवून प्रसंगी शारीरिक, आर्थिक, शैक्षणिक मदत करीत असत. त्या काळात जबाबदारीचं ओझं कधीही कुणालाही वाटत नसे. जबाबदारी ओझं न वाटू देता मनाने पार पाडत राहणे हेच खरं तर कुटुंबातील सर्व सदस्यांचं कौशल्य आहे. हेच खरे माणूसपण व हीच खरी माणुसकी आहे.

यातच, खरा मानवधर्म आहे. हे शंभर टक्के अगदी खरं आहे. विसाव्या शतकापर्यंत हे सर्व काही व्यवस्थितपणे पार पाडलं जात असे किंवा सुरळीत चालू असे. पण एकविसाव्या शतकापासून यामध्ये बदल होण्यास सुरुवात झाली.

अत्याधुनिकतेच्या तंत्रज्ञानाच्या या युगात बहुतांशी माणसं आत्मकेंद्रित आणि स्वतःचा स्वार्थ साधण्याच्या मनोवृत्तीची झाली आहेत. त्यासाठी अशी काही स्वार्थी माणसं कोणत्याही थराला जाऊन अघोरी कृत्ये, माणुसकीहीन दूष्कृत्ये करीत आहेत. अशा घटनांच्या बातम्या दैनंदिन वर्तमानपत्रात वाचायला मिळतात. तसेच, यांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत चालले आहे. माणसा माणसांमधील संवाद खूप कमी झाला आहे. पूर्वी रहिवासी चाळ संस्कृती होती. त्यामुळे, घरे छोटी होती व एक घर दूस-या घराला लागूनच असे. त्यामुळे, लोकांच्या अपेक्षा आणि गरजाही मर्यादित होत्या. लोकांमध्ये आपुलकीची मदतीची भावना होती.

गरीब श्रीमंत असा भेदभाव कोणाच्याही मनात नव्हता. सर्वांच्या वागण्यात, बोलण्यात मनमोकळेपणा होता. त्यामुळे, घराघरातील व सार्वजनिक वातावरण मनमोकळेपणाचे राहात असे. परंतु, काळ बदलला तसं तसं घराघरांचे स्वरुप बदलले गेले. फ्लॅट संस्कृतीमुळे लोकांचे स्वभावही बदलत गेले. त्यामुळे, आपापसातील संवाद, गप्पाटप्पा, गुजगोष्टी, वस्तूंची देवघेव या सा-यांमध्ये अंतर पडत गेले. याचा परिणाम असा झाला की, माणसं माणसांपासून दूर होत गेली. आपलेपणा, प्रेम, जिव्हाळा व मनाचा मोकळेपणा कमी कमी होत गेला. आपलंच समजून हक्काने वस्तू घेण्यादेण्याच्या, खाण्यापिण्याच्या पदार्थांच्या बाबतीत खूपच फरक पडत गेला. त्यामुळे, सहजीवनाची गोडी कमी कमी होत जावून माणसा माणसांतील सहवासाचे अंतर, आपलेपणाच्या स्वभावात खूप अंतर पडत गेले. **(क्रमश:)**

# अंधश्रध्देच्या पर्दाफाशाची कहाणी : गढीवरची हडळ


**पुस्तक परीक्षण**

उमेश मोहिते,
अंबाजोगाई

**ज्योतिर्मय साहित्य**

दमकोंडी या बहुचर्चित कथासंग्रहानंतर लेखिका ज्योती सोनवणे यांची गढीवरची हडळ ही बालकादंबरी नुकतीच प्रकाशित झाली असून ही छोटीशी बालकादंबरी ग्रामीण भागातील लोकांच्या मनात दबा धरून असलेल्या भूत,हडळ पिशाच्च इत्यादि अंधश्रद्धांचा पर्दाफाश करणारी आहे.बंटी नांवाचा शहरातील एक हुशार आणि चुणचुणीत मुलगा खेड्यातल्या मावशीकडे सुट्टीला येतो आणि तो स्वतः च्या अंगभूत हुशारीने गाव-खेड्यात प्रचलित असलेल्या भूत,हडळ,माणसंमारी इत्यादिंचा बीमोड करतो.त्यासाठी तो तेथील छोट्या मित्रांची गँग तयार करतो आणि ही गँग बंटीच्या कल्पक मार्गदर्शनाखाली कार्यरत राहून भूत वगैरे सारं काही थोतांड आहे,हे साऱ्या गावाला पटवून देते. कथानायक असलेला बंटी करणी,भानामती,हडळ वगैरे सारे काही मनाचे खेळ असतात ,हे गावकऱ्यांना पटवून देतो आणि गावकऱ्यांना अंधश्रध्देच्या विळख्यातून दूर करतो.अशा आशयाची ही कहाणी असून लेखिकेने नेमके संवाद,ओघवती लेखनशैली आणि ग्रामीण बोलीचा वापर करून हे सारे नाट्य अगदी रंजकतेने लेखणीव्दारे इथे साक्षात केले आहे.या कथेच्या गुंफणीत कुठेही कृत्रिमता न येऊ देता अगदी सहजसुंदरतेने ही बंटीची कहाणी गोड शेवटापर्यंत पोहोचून आपले इप्सित गाठण्यात यशस्वी झाली आहे ,हे नक्की ! अर्थात उत्कंठावर्धक कथानक असलेल्या या कहाणीत बंटी त्याच्या सवंगड्यांच्या मनातली भुता-खेतांची भीती कशी दूर करतो ? ही गँग अतिशय धाडशी बेत कशी आखत जाते ? खेड्यातली ही निरक्षर माणसे अंधश्रध्दाळू का असतात ?अशा अंधश्रद्धांचा लाभ कोणाला होत असतो ? या साऱ्या प्रश्नांची उत्तरे मिळवण्यासाठी ही रोचक नि वेधक कहाणीच वाचणे क्रमप्राप्त आहे.थोडक्यात बंटीची ही कहाणी बाल-कुमार वाचकांना विज्ञानवादी बनण्याचा संदेश अगदी सहजच्या अकृत्रिमतेने तर देतेच ; याशिवाय खेड्यातल्या अनोख्या जगाची अद्भूत सफरही मुलांना घडवून आणते.शिवाय कथानायक बंटीचे आचार-विचार नि कृती मुलांना प्रेरणादायी ठरणार आहे आणि या सर्व वैशिष्ट्यांमुळे म्हणूनच म्हणावेसे वाटते की ही रंजक बालकादंबरी बाल -कुमार वाचकांच्या पसंतीस उतरेल,यात शंका नाही. हेच लेखिकेचे यश मानावे लागेल.

( बालकादंबरी ) - गढीवरची हडळ
लेखिका - ज्योती सोनवणे
प्रकाशक - इसाप प्रकाशन, नांदेड मो. ( ९९६०१ ६२८३० )
पृष्ठे - ६४ मूल्य - १५०
मुखपृष्ठ - शीतल शहा






# अष्टपैलू व्यक्तिमत्व प्रा. डॉ. कन्नूलाल विटोरे सर



ज्योतिर्मय साहित्य

प्राध्यापक असं नाव जरी ऐकलं तर सुटा-बुटातले, आवाजात दाब टाकून बोलणारे, नजरेत नजर घालून बोलणारे महाशय आपल्या समोर उभे राहतात. असं म्हणतात की एखादा डॉक्टर बिघडला तर एखादा रुग्ण दगावेल. एखादा अभियंता बिघडला तर एखादी इमारत कोसळेल पण; एखादा प्राध्यापक बिघडला तर पूर्णच्या-पूर्ण पिढीचं गारद होईल. शिक्षक हा समाजाचा कणा समजला जातो आणि आहेचं. शिक्षक दिनानिमित्त अनेक जण आपापल्या शिक्षकांचं गोड भाषेत वर्णन करतात. वेगवेगळ्या उपमा देतात. एवढंच काय तर संत कबिरांनी देखील गुरूच महत्व स्पष्ट केलं आहे. ''गुरू गोविंद दो खडे काकी लागू पाऊ''

म्हणजे गुरू आणि देव सोबत उभा आहेत आणि मी कोणाचे पाय धरू. अर्थात मी गुरूचे पाय धरीन कारण, गुरू मुळे मला देवाचे दर्शन लाभले. प्रत्येकाच्या आयुष्यात असे काही गुरुजन येतात ज्यांना आपण आपलं सुख-दुःख, समस्या आणि मनमोकळ्या गप्पा मारू शकतो. त्यांच्या वर प्रेम करतो. त्यांना जीव लावतो. त्यांच्यावर जीव ओवाळून टाकतो. त्यांना आपलंसं करून घेतो. त्यांना विश्वास देत असतो. असा एक तरी शिक्षक आपल्या आयुष्यात असतोच असतो. मातीचा गोळा ओला असताना त्याला आकार देता येतो हे अचूक ओळखून राजमाता जिजाऊ मा साहेबांनी छत्रपती शिवाजी महाराजांवरती अत्यंत महत्त्वपूर्ण संस्कार केले. आणि ह्याच राजान ३६० गडाच्या छाताडावर भगवा फडकवून स्वराज्य निर्माण केलं. छत्रपती शिवाजी महाराजांची राजमाता जिजाऊ मासाहेब ही पहिली गुरु झाली. शिष्य आपल्या गुरुचं अनुकरण करत असतो. त्यांच्याकडून नवनवीन कल्पना तो घेत असतो. गुरुजींनी पाठीवरती शाबासकीची थाप द्यावी दहा हत्तीचे बळ अंगात शिरावं असाच आहे गुरुचा महिमा. अ च्या अज्ञानापासून तर ज्ञ च्या ज्ञानापर्यंतचा प्रवास म्हणजेच गुरु होय. गीतेमध्ये स्पष्ट लिहिलंय, की

गुण मिले तो गुरु बनाओ, चित्त मिले तो चेला, मन मिले तो मित्र बनाओ, वरना रहो अकेला. आज मी एका अनोख्या प्राध्यापकां विषयी सांगणार आहे, जे नेहमीचं हसत मुख असतात.आपल्या कामाशी प्रामाणिक असतात.सरांना रोज अनेक नवनवीन विदयार्थी भेटतात.पण प्रत्येक विद्यार्थ्यांशी नम्रपणे आणि माय माखल्या नजरेनं बघणारे व तुपात भिजलेल्या शब्दांनी बोलणारे आमच्या मॉडेल डिग्री महाविद्यालयाचे उपप्राचार्य, हिंदी विभागाचे विभाग प्रमुख डॉ.कंन्नूलाल विटोरे सर होय.....! महाविद्यालयाच्या तासिका संपल्यावर सगळे मित्र आपापल्या मित्रांना शोधण्यात व्यस्त असायचे. आणि आम्ही सरांना शोधायचो. कारण प्रत्येक मित्र हिंदी विभागात भेटायचा. एकाच छताखाली सगळे असायचे तो म्हणजे मॉडेल कॉलेजचा हिंदी विभाग होय..! मॉडेल कॉलेजचे उपप्राचार्य हे पद सांभाळत सर लोकमत समाचारचे देखील तालुका प्रतिनिधी आहेत. आदरणीय प्रा. डॉ. कन्नूलाल विटोरे सरांची एकूण आठ पुस्तके प्रकाशित आहेत.



वलयांकित चेहरे

संजय व्यापारी, संपादक

त्यामध्ये ०१. सूर्यबाला की कहानियो का मनोवैज्ञानिक अध्ययन :थाली भर चांद के विशेष संदर्भ मे, २. तलाशता सच (काव्य संग्रह), ३. सूर्यबाला के कथा-साहित्य मे सामाजिक, आर्थिक एवं मनोवैज्ञानिक अध्ययन ४. तलाशता सच (काव्य संग्रह) द्वितीय संस्करण (२०२२) ५. मराठी लोक साहित्य कोश - (२०२३) केंद्रीय हिंदी संस्थान आगरा, सह- संपादन, ६. हार से नहीं आ हारा हूं (काव्यसंग्रह), ७. कोवळे उन्ह, मी अजूनही तेथेच आहे (अनुवादित हिंदी से मराठी ), ८. मेरी अनुभूती, मेरे अपने ( संस्मरणात्मक आलेख संग्रह) याचबरोबर त्यामध्ये १. सुंदरेश्वर साहित्यरत्न पुरस्कार २०२३, २.महाकवी कालिदास प्रतिष्ठान साहित्य साधना पुरस्कार २०२४ हे पुरस्कार मिळाले आहेत.

तिसरे आद्य कवयित्री महदंबा साहित्य संमेलन २०२४ कवी संमेलन अध्यक्ष, मराठवाडा साहित्य संमेलन निमंत्रित कवी, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय हिंदी मराठी कवी संमेलन सहभागी. भटक्या विमुक्त समाजावर लेखन तसेच प्रकृती पर्यावरण विविध संस्थां सोबत कार्यरत. पत्रकारिता लोकमत समाचार सह विविध वर्तमानपत्रात लेखन सरांनी केलेलं आहे. याचबरोबर सर हिंदी अध्ययन मंडल आबासाहेब गरवारे महाविद्यालय (स्वायत्त) कर्वे रोड, पुणे निमंत्रित सदस्य- हिंदी अध्ययन मंडळ, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विश्वविद्यालय, छत्रपती संभाजी नगर २०१९ ते आतापर्यंत कार्यरत आहेत.

मॉडेल कॉलेजचा सांस्कृतिक विभाग देखील सर सांभाळतात. युवक महोत्सव असो, राष्ट्रीय सेवा योजनाचे कार्यक्रम असो, शिक्षक दिन असो वा अजून कोणताही कार्यक्रम असो.सरांचं नाव अग्रगन्य असतं. ग्रामीण भागातील एक ही विद्यार्थी शिक्षणापासून वंचित नाही राहिला पाहिजे.हा सरांचा मुख्य हेतू.आज कॉलेज खूप आहेत.प्राध्यापक खूप आहेत पण म्हणतात ना योग आहे तर योग आहे.सरांचा पूर्ण दिवस कामात जातो.तरी देखील सर आपला छंद जोपासतात.प्रत्येक विद्यार्थ्याला आपलंसं करून बोलतात. सरांची ग्रामीण भागाशी नाळ अगदी घट्ट जुडलेली आहे. थकलेल्या, रंजलेल्या, गांजलेल्या, गरीब, होतकरू, दुःखी, कष्टी या सर्वांना

हार से नहीं हारा हूं डर से नही डरा हूं
तपती धूप में खिला हूं धूप से नही डरा हूं

या कवितेच्या ओळी अगदीच लागू पडतात. सरांचं कार्य असिमीत आहे.अमर्याद आहे.निस्सिम आहे.विशाल आहे.सरांची ग्रामीण भागाशी नाळ घट्ट आहे.आपल्या कविताच्या माध्यमातून सर नेहमी खेड्याचं वर्णन करतात.एक प्राध्यापक,एक कवी,एक महान लेखक आणि समजून उमजून घेणारे शिक्षक आम्हास लाभले.परी काय लिहावे. हा मोठा प्रश्न आहे.शब्द अपुरे पडतील अस कार्य आहे सरांचं. आज सरांच्या वाढदिवसा निमित्त हा छोटासा प्रयत्न....! परी माझ्या दैवा पार नाही. आज समाजात दिसतंय कोना एका भ्रष्ट पुढार्यांचा, एका बलात्कारी माणसांचा,एका गुंडांचा आदर्श घेऊन आपला समाज कितपत प्रगती करणार आहे? याचा विचार करणं गरजेचं आहे.लिहिण्याचा हेतू एवढाच आहे की समाजातल्या तरुण युवकांनी सरांचा आदर्श घेऊन आपलं जीवन दैदिप्यमान करावं... हाच या लेखमागचा संदेश आहे...

# वाचन संस्कृती वाढविण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक-जयकुमार रावल

ज्योतिर्मय साहित्य

**धुळे** – सध्याच्या डिजिटील युगामध्ये नागरीकांचा वाचण्याकडे कल कमी होत चाललेला आहे. वाचनाने माणूस समृध्द होत असल्याने ही वाचन संस्कृती वाढविण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणे, त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी सर्वांचे सहकार्य आवश्यक असल्याचे प्रतिपादन राज्याचे पणन व राजशिष्टाचार तथा धुळे जिल्ह्याचे पालकमंत्री जयकुमार रावल यांनी केले.



राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई आणि जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय, धुळे, ज्येष्ठांचे टोणगांवकर ग्रंथालय, दोंडाईचा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित दोन दिवसीय धुळे ग्रंथोत्सवाचे उद्घाटन दादासाहेब रावल हायस्कुल व कनिष्ठ महाविद्यालय, दोंडाईचा येथे आज मान्यवरांच्या उपास्थितीत संपन्न झाले, यावेळी ते दूरदुष्यप्रणालीद्वारे देण्यात आलेल्या आपल्या शुभेच्छा संदेशात बोलत होते. या कार्यक्रमास खासदार डॉ. शोभाताई बच्छाव, जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर, ५ वे अखिल भारतीय अहिराणी साहित्य समेलनाचे अध्यक्ष सुभाष भामरे, उद्योगपती सरकारसाहेब रावल, माजी नगराध्यक्षा नयनकुंवरजी रावल, जिल्हा माहिती अधिकारी विलास बोडके, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे प्रमुख कार्यवाहक अनिल सोनवणे आदी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री.रावल आपल्या शुभेच्छा संदेशात म्हणाले की, धुळे ग्रंथोत्सव २०२४ या कार्यक्रमाचा शुभारंभ आपल्या सगळ्यांचा साक्षीने पहिल्यांदा दोंडाईचा इथे होत आहे. वाचन संस्कृती ही पूर्वीपासून आपल्या देशामध्ये आहे. पूर्वीपासून वाचन, ज्ञान प्राप्त करणं आणि त्याच्या माध्यमातून जीवन जगणं ही भारतामध्ये हजारो वर्षांपासूनची परंपरा राहिलेली आहे. मध्यंतरीच्या काळामध्ये आणि विशेषतः आता या मोबाईलच्या युगामध्ये वाचन संस्कृतीकडे लोकांचा कल कमी होत चाललेला आहे. परंतु जो वाचेल, तोच वाचेल या उक्तीप्रमाणे सर्वांनी वाचण्यासाठी लोकांना प्रवृत्त करणं, लोकांना प्रोत्साहित करणं, लोकांची व्यवस्था करून देणं ही देखील आपल्या सगळ्यांची जबाबदारी आहे. विद्यार्थ्यांनी वाचनाकडे लहानपणापासूनच लक्ष दिले पाहिजे. त्यांना वाचनासाठी प्रोत्साहित केलं पाहिजे असे सांगून ते म्हणाले की, येत्या काळात दोंडाईचा येथे एक मोठं वाचनालय उघडण्याचा प्रयत्न राहील.






# जीवन दान...!

ज्योतिर्मय साहित्य



नरसापूर गाव या गावात महात्मा फुले विद्यालय असून त्यामध्ये इयत्ता पाचवी ते बारावीपर्यंतचे जवळ - जवळ सातशे ते साडेसातशे विद्यार्थी शिक्षण घेतात. शाळेतले मुख्याध्यापक माने सर हे निष्णात शिक्षक. ते नरसापूर गावातच राहतात. नरसापूरच्या प्रत्येक नागरिकांमध्ये माने गुरुजींचा आदरयुक्त मान होता. त्याचे कारणही तसेच आहे. माने गुरुजींचा नरसापूर गावातील महात्मा फुले विद्यालयाच्या उभारणीत मोलाचा वाटा असून अगदी विद्यालयाची जागा घेण्यापासून ते वर्गखोल्यांच्या बांधकामापर्यंत माने गुरुजी दिवसरात्र राबलेत. नरसापूरगावात कोणतेही कार्ये असो, त्यामध्ये प्रत्येक गावकरी माने सरांचा सल्ला घेतल्या शिवाय ते कार्य करीत नसे. मग तो गावचा सरपंच असो किंवा पोलीस पाटील अथवा गावातील अनुभवी वयोवृद्ध मंडळी असोत, माने गुरुजी नरसापूर गावात मागील तीन दशकांपासून राहतात. माने सरांना प्रत्येक धर्मांचे, जातींचे, पंथाचे लोक मनापासून गावातला प्रमुख मानायचे आणि माने सरांचा स्वभाव अगदी मनमिळाऊ मितभाषी, व जिव्हाळ्याचा होता. ते कोणत्याही समाजाच्या लग्नकार्य, धार्मिक कार्य, सामाजिक कार्यात बऱ्या वाईट प्रसंगांत व घटनांमध्ये सामील होत असे. म्हणून नरसापूरच्या प्रत्येक नागरिकात माने सरांविषयी आदरयुक्त भावना होती.

शाळेतही आपल्या शिक्षकवृंदांशी नेहमी ते प्रेमाने व आपुलकीने वागणारे मुख्याध्यापक म्हणून अशी त्यांची ख्याती होती. त्यामुळे शाळेतील सर्व शिक्षक मंडळी स्वतःला झोकून देऊन अध्यापनाचे व इतर शालेय कार्य मनापासून करायाचे. परिणामी महात्मा फुले विद्यालय हे तालुक्यातच नव्हे तर अवघ्या पंचक्रोशीत व संपूर्ण जिल्ह्यात शिक्षणासाठी प्रसिद्ध होते. याशिवाय माने सरांनी गावाच्या बाबतीतही सकारात्मक विकासाची भूमिका राबवून गावात जनजागृती करून सरकारचे, उपक्रमांविषयी गावात एकतेचे महत्त्व स्वच्छतेचे महत्त्व गावकऱ्यांना समजावून सांगून दोनदा, महात्मा गांधी तंटामुक्तीचा पुरस्कार व स्वच्छ भारत उपक्रमाअंतर्गत स्वच्छता अभियान हे नरसापूर गावात राबविले.

नरसापूर गावात मुस्लिम समाजाची दहाबारा घरे होती. त्यातील काही मध्यम वर्गाची तर काही मोल मजुरीची कामे करणारी कुटुंबे राहत होती आणि त्यामध्ये सत्तारभाई आणि त्यांची पत्नी सलीमाबाई ही पण राहत असे त्यांना लवकर मुलबाळ झालेले नव्हते. लग्नानंतर दहा-बारा वर्षांनी सत्तारभाईला एक मुलगा झाला. करीम असे त्याचे नामकरण करण्यात आले. करीम हा एकुलता एक मुलगा पण प्रकृतीने अगदी सडपातळ होता. तो सहा वर्षांचा झाल्यावर शाळेत जाऊ लागला. पुढे चौथीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर त्याने महात्मा फुले विद्यालय पाचवीत प्रवेश घेतला. दररोज शाळेत जाणे, अभ्यास करणे आणि फावल्या वेळेत आईवडिलांना घरकामांत मदत करणे. तसे सत्तारभाई स्वभावाने चांगले होते. गावात साऱ्यांशी मिळून - मिसळून वागणारे, कोणतेही काम करण्याची वृत्ती, गावात मिळेल ते काम करून आपल्या कुटुंबाचा प्रपंच चालवीत असे. सत्तारभाई आणि माने सरांची चांगलीच रास जुळलेली होती. त्यामुळे त्या दोघात नेहमी भेटीगाठी होऊन त्यांच्यात मुक्त संवाद होत असे. सत्तारभाई माने सरांना अलीकडे दररोज शाळेत येऊन भेटाययचे. करीमच्या अभ्यासाची विचारपूस करायचे. सर्व शिक्षकांना करीमकडे लक्ष देण्याची आदरपूर्वक विनंती करीत असत. शिक्षक मंडळीही सत्तारभाईला एक जागरूक पालक या नात्याने मान देत असत.

करीम आता आठवीच्या वर्गात शिकत होता. आपले आईवडील गरीब आहेत. ते आपल्या प्रत्येक मागण्या पूर्ण करू शकत नाहीत. करीम शाळा सुटल्यावर व शाळा भरण्याअगोदर शिक्षकांच्या घरी पाणी भरणे - किराणा सामान आणून देणे. अर्थातच शिक्षकांनी सांगितलेली कामे करायचा. त्याचबरोबर आपला अभ्यासही तो नियमितपणे पूर्ण करीत असे. त्यामुळे करीम हा शाळेतील सर्व शिक्षकांच्या गळ्यातला ताईत बनला होता. करीमचा अभ्यासात - खेळात व इतर स्पर्धेमध्ये नेहमी प्रथम क्रमांक येत असे. परंतु करीमची प्रकृती ही सडपातळ असल्याने करीमला वारंवार उलट्या होणे, चक्कर येणे,अन्न अपचन होणे, हे त्याचे नेहमीच त्रास होऊन बसले होते. बरे त्याला तालुक्याच्या तज्ज्ञ डॉक्टराला दाखवावे तर घरात आठरा विश्वे दारिद्र्य आई सलीमाबाई गावातील पाटील, देशमुख, इनामदारांच्या मळ्यात - शेतात मोलमजुरीची कामे करीत. त्यामुळे कसे तरी त्यांचा उदरनिर्वाह चाले. त्यामुळे घरात पैसेही शिल्लक राहत नसत.

करीमच्या आजारपणाची गोष्ट मुख्याध्यापक माने सरांच्या कानावर गेली. कारण माने सरांना मूलबाळ नव्हते. म्हणून ते मनापासून करीमलाच आपला मुलगा मानीत होते. आणि त्यातच ते आनंदी होत असत. जसजसे करीमचे वय वाढत होते तसतसे त्याचा आजाराचा त्रास सुद्धा वाढतच होता. एके दिवशी शाळेतील सर्व शिक्षकांनी स्वतःहून पैसे जमा करून करीमला जिल्ह्याच्या तज्ज्ञ व नामांकित डॉक्टरांच्या दवाखान्यात नेण्याचा विचार केला. त्याच्या सर्व तपासण्या करण्यात आल्या. तपासणीचा अहवाल प्राप्त झाला. त्यात करीमच्या दोन्हीही किडन्या निकामी झालेल्या निघाल्या. ही वार्ता ऐकून सत्तारभाई तोंड झोडून - झोडून रडू लागले. सलीमाबाई तर गळा काढून फार रडल्यामुळे त्यांची शुद्ध हरपली. सारा गाव दुःखात बुडून हळहळ व्यक्त करू लागला. माने गुरुजीसह साऱ्या शिक्षकांचे डोळे पाणावले.



बाल साहित्य

अय्युब पठाण लोहगावकर
पैठण मो.९७६४३ ५०३७४

आता सत्तारभाईवर संपूर्ण दुःखाचा डोंगर कोसळला होता. करीमचा दवाखान्याचा खर्च हा सत्तारभाईच्या आवाक्या बाहेरचा होता. एकुलताएक मुलगा त्यातही त्याच्या दोन्ही किडन्या निकामी. आता माझ्या मुलाचे काय होईल? ही चिंता त्यांना वाटत होत. **(क्रमशः)**

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी १०१, सी विंग, सिल्व्हर स्पेस सोसायटी, विशाल नगर, पिंपळे निलख, पुणे-४११००१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743918559